# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २९/०८/२०१८

## सजा कदमवाकस्ती ता. हवेली जिल्हा पुणे येथील तलाठयास दोन हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांनी मौजे कदमवाकवस्ती येथे २० गुंठे जमिन खरेदी केली होती. सदर खरेदीची ७/१२ उताऱ्यावर चुकीची नोंद झाली होती. सदर चुकीच्या नोंदीमध्ये दुरूस्ती करण्यासाठी अर्ज केला होता. त्यावरून सदरची दुरूस्ती करण्यात आली होती. सदर दुरूस्त केलेल्या ७/१२ उताऱ्याच्या प्रतीवर सही शिक्का देवून ७/१२ उताऱ्याची प्रत देण्यासाठी कदमवाकवास्ती, लोणीकाळभोर ता. हवेली जिल्हा पुणे येथील तलाठी शेवाळे याने दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २९/०८/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक शेवाळे, तलाठी, कदमवाकवस्ती, लोणीकाळभोर ता. हवेली जिल्हा पुणे याने तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीचा दुरूस्त केलेल्या ७/१२ उताऱ्याच्या प्रतीवर सही शिक्का देवून ७/१२ उताऱ्याची प्रत देण्यासाठी दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक २९/०८/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक गेणभाऊ जयवंत शेवाळे, वय - ५२, तलाठी सजा कदमवाकवस्ती ता. हवेली जिल्हा पुणे तक्रारदार यांचेकडून २,०००/- रूपयांची लाचेची रक्कम कदमवाकवस्ती येथे स्वतःचे घरात स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( दत्तात्रय भापकर )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे